# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, गुरुवार, दिनांक २५ डिसेंबर २०२५ ■ वर्ष १७ ■ अंक ३०२ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/- वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### जमलं रे जमलं

नाही हो, नाही हो करता अखेर उद्धव ठाकरे यांची शिवसेना आणि मनसेचे राज ठाकरे या ठाकरे भावंडात युती झाली. विस वर्षानंतर ठाकरे बंधू एकत्र आले. नाहीतरी दोन्ही पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना ठाकरे बंधूंची युती व्हावी असे मनापासून वाटत होते. परंतु, योग जुळून येत नव्हता. दोन दिशेला दोन तोंड असलेल्या ठाकरे भावंडांमध्ये युती कोण घडवून आणणार हा महत्वाचा प्रश्न होता. दोघाही भावांना बोलणे म्हणजे वाघाच्या तोंडात हात टाकण्यासारखे होते. त्यामुळे दोन्ही पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते गप्प होते. परंतु, मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही भावांना सपाटून मार खावा लागला. त्यानंतर दोघांचेही डोळे उघडले. मराठी माणसाच्या अस्तित्वासाठी युती हाच उपाय असल्याचे दोघांच्याही लक्षात आले. त्यासाठी प्रयत्न सुरू झाले आणि दोन्ही भावात युती होणार अशा चर्चा पसरू लागल्या. परंतु, युती कधी होणार हे कुणीच काही सांगत नव्हते. मात्र, दोन्ही भावांचे ऐकमेकांच्या घरी येजा सुरू झाल्याने दोघात युती होणार हे निश्चित मानल्या जात होते. पण कधी होणार हे कुणीच स्पष्टपणे सांगत नव्हते. होणार, होणार, लवकरच होणार अशाच वावड्या उठत होत्या. पण कधी हा प्रश्न अनुत्तरीत होता. शेवटी तो दिवस उजाडला आणि युतीची तारीख आणि स्थळ ठरल्या गेले. शंभर टक्के युती होणार हे लक्षात आल्यानंतर पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. कार्यकर्ते आनंद व्यक्त करू लागले. त्यानंतर युतीचा दिवस आला. अवघ्या १२ मिनिटांच्या पत्रपरिषदेत दोन्ही भावांनी युतीची घोषणा केली आणि राजकारणातील वातावरण बदलून गेले. विरोधकांच्या मनात धस्स झाले. मुंबईसह १२ महापालिकांवर आमची युती राहील अशी घोषणा करायलाही दोन्ही भाऊ विसरले नाही. बर झाल आपसात भांडणापेक्षा युती करून भांडलेल बरं. युतीची घोषणा होताच कार्यकर्त्यांमध्ये उत्साह संचारला. ढोलताशाच्या निनादात त्यांनी आपला आनंद व्यक्त केला. युती झाल्यामुळे निदान मराठी माणसांची मते विखुरली जाणार नाहीत अशी आशा करायला काही हरकत नाही.

## अखेर ठाकरे बंधूची युती


पत्रपरिषदेत युतीची घोषणा करताना उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४**
महाराष्ट्राच्या राजकारणात आज इतिहास घडला. दोन दशकांहून अधिक काळ मराठी मनात घोळत असलेला प्रश्न अखेर संपला. आणि यांनी मुंबई महापालिका निवडणुकांसाठी अधिकृत युती जाहीर करत विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकवली. ही घोषणा केवळ निवडणूक गणित नाही, तर मराठी अस्मितेचा थेट रणशिंगनाद आहे, असा ठाम सूर दोघांनीही आळवला.
संयुक्त पत्रकार परिषदेत ठाकरे बंधूंनी जागावाटप, नेतृत्व आणि महापौरपद या तिन्ही मुद्द्यांवर स्पष्ट भूमिका मांडत संभ्रमाचे धुके दूर केले. ''मराठी माणसाचा हक्क, मुंबईचा स्वाभिमान आणि महाराष्ट्राचे भवितव्य''या तीन ध्येयांसाठी मतभेद बाजूला ठेवून आम्ही एकत्र आलो आहोत, असा ठाम निर्धार व्यक्त झाला.
कार्यक्रमाची सुरुवात करताना भावूक झाले. ''आजचा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल. संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश जसा आला, तसाच आज मराठी ऐक्याचा मंगल कलश उद्धवराज यांच्या रूपाने आला आहे. मुंबईसह सर्व महापालिकांवर आता भगवा फडकणार,'' असा थेट दावा त्यांनी केला.
उद्धव ठाकरे यांनी भाषणात आक्रमक भूमिका घेत दिल्लीच्या सत्ताकेंद्रांवर आणि भाजपच्या नरेटिव्हवर घणाघाती हल्ला चढवला. ''प्रबोधनकार ठाकरे आणि बाळासाहेब ठाकरे यांनी मुंबईसाठी रक्त सांडले. आज मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची स्वप्नं पाहिली जात आहेत. आम्ही कर्तव्य म्हणून एकत्र आलो आहोतहे नाते तुटणार नाही. कटेंगे तो बटेंगे म्हणणाऱ्यांना मी सांगतोचुकाल तर संपल. मराठी माणसाने आता एकत्र येण्याची हीच वेळ आहे,'' असा इशारा त्यांनी दिला.
राज ठाकरे यांनी युतीमागची वैचारिक धार स्पष्ट करताना राजकीय दलालशाहीवर निशाणा साधला. ''कोणत्याही भांडणापेक्षा महाराष्ट्र मोठा आहेमी हे आधीच सांगितलं होतं. आज राज्यात पक्ष पळवणाऱ्या टोळ्या फिरत आहेत. महाराष्ट्राला स्थिरतेची गरज आहे. ही युती फक्त निवडणुकीपुरती नाही; महाराष्ट्राच्या हितासाठीची आहे. मुंबईची युती ही पहिली पायरी आहे. मुंबईचा महापौर मराठीच असेलआणि आमचाच असेल,'' असा ठणकावून संदेश त्यांनी दिला.
या घोषणेनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. विरोधकांसाठी ही थेट आव्हानाची घंटा असून, सत्ताधाऱ्यांना आता मराठी ऐक्याच्या वादळाला सामोरे जावे लागणार आहे. मुंबई महापालिकेच्या रणांगणात ठाकरे बंधू एकत्र उतरल्याने समीकरणे उलथून पडली आहेतआणि राजकारणाचा सूर पूर्णतः बदलला आहे.

## प्रचार संपल्यानंतर निवडणूक जाहिरातींवर बंदी

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४**
महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. जाहीर प्रचाराची मुदत १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक, मुद्रित तसेच अन्य कोणत्याही प्रसारमाध्यमांतून निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध किंवा प्रसारित करता येणार नाहीत, अशी स्पष्ट माहिती यांनी दिली.
राज्य निवडणूक आयोगाकडील नोंदणीकृत व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची महानगरपालिका निवडणुकांच्या अनुषंगाने आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस आयोगाचे सचिव यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.
**मतदान १५ जानेवारीला**
राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे यांनी सांगितले की, १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होणार आहे. संबंधित कायद्यानुसार मतदान समाप्तीच्या ४८ तास आधी, म्हणजेच १३ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता जाहीर प्रचाराची मुदत संपेल.

## महाविकास आघाडीत बिघाडी ?

### ठाकरे बंधूंच्या युतीनंतर काँग्रेसची स्वबळाची घोषणा



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४**
शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि मनसे यांच्यातील युतीनंतर आता महाविकास आघाडीतील मतभेद उघडपणे समोर येऊ लागले आहेत. ठाकरे बंधू एकत्र आल्याने राजकीय समीकरणे बदलत असतानाच, काँग्रेसने या युतीपासून स्पष्ट दुरावा ठेवत महापालिका निवडणुका स्वबळावर लढविण्याची ठाम भूमिका जाहीर केली आहे. त्यामुळे महाविकास आघाडी प्रत्यक्षात तुटली आहे का, असा प्रश्न राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.
महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष यांनी ठाकरे बंधूंच्या युतीवर भाष्य करताना काँग्रेसची भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, ''काँग्रेसचे राजकारण सर्वसमावेशक आहे. धर्माच्या आधारावर राजकारण करणाऱ्या पक्षांची भूमिका आम्हाला मान्य नाही. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीबाबत आम्हाला कोणतेही भाष्य करायचे नाही.''
**'मुख्य लढत भाजपशीच' काँग्रेसची भूमिका**
सपकाळ यांनी स्पष्टपणे सांगितले की, ''महापालिका निवडणुकांमध्ये काँग्रेसचा मुख्य प्रतिस्पर्धी भाजपाच आहे. त्यामुळे या निवडणुका काँग्रेस स्वबळावर लढवेल आणि भाजपाला शह देण्याचा आमचा प्रयत्न असेल.''
या वक्तव्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत काँग्रेस वेगळी वाट पकडणार असल्याचे संकेत स्पष्ट झाले आहेत.
मनसे प्रमुख आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) प्रमुख यांच्या युतीला 'मराठी एकजूट' म्हणून पाहिले जात असले, तरी काँग्रेसने या राजकारणाशी स्वतःला जोडण्यास साफ नकार दिला आहे. काँग्रेसच्या भूमिकेमुळे महाविकास आघाडीतील समन्वयाला धक्का बसल्याचे चित्र आहे.लोकसभा व विधानसभा निवडणुकांत एकत्र असलेली महाविकास आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मात्र एकत्रित न दिसण्याची शक्यता अधिक झाली आहे. एकीकडे ठाकरे बंधूंची युती, तर दुसरीकडे काँग्रेसची स्वबळाची तयारीयामुळे आघाडी केवळ कागदावरच उरते की काय, अशी चर्चा सुरू झाली आहे.

## २० किलो डोडा जप्त

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २४**
नागपूर ग्रामीणच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने वडोदा (ता. कामठी) येथील मालवा पंजाब ढाबा येथे धाड घालून २० किलो डोडा पावडर जप्त केली.
ढाबामालक असलम प्याराखान (२१) बरहमपूर, लुधियाना याने वडोदा येथे मालवा नावाने ढाबा सुरू केला होता. या ढाब्यातून तो डोडा पावडरची विक्री करीत असे. अंमली पदार्थ विरोधी पथकाला ही माहिती समजताच मौदा पोलिसांच्या मदतीने त्यांनी ढाब्यावर धाड घातली. या धाडीत पोलिसांना ३ लाख ६६०० रुपयांची डोडा पावडर मिळून आली. पोलिसांनी पावडर, दुचाकी मोबाईल असा ३ लाख ७१ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी मौदा पोलिसांनी गुन्हा नोंदवून असलम यास अटक केली.

## काँग्रेस आणि रासपमध्ये युती


काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि रासपचे माधव जानकर युतीसंदर्भात चर्चा करताना

**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २४**
राज्यातील नगरपालिका निवडणुकांनंतर आता होणाऱ्या महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी काँग्रेस पक्षाने तयारी सुरू केली असून, या निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रीय समाज पक्ष (रासप) एकत्र लढणार असल्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. ही घोषणा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि रासपचे राष्ट्रीय अध्यक्ष, माजी मंत्री महादेव जानकर यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत केली.
मुंबईतील टिळक भवन येथे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ आणि रासप अध्यक्ष महादेव जानकर यांच्यात महापालिका व जिल्हा परिषद निवडणुकांबाबत सविस्तर चर्चा झाली. या बैठकीनंतर दोन्ही नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन आघाडीची औपचारिक घोषणा केली.
यावेळी बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, ''महादेव जानकर हे बहुजन समाजाचा आश्वासक आवाज आहेत. देशात भाजपकडून लोकशाही व संविधान पायदळी तुडवण्याचे काम सुरू आहे. अशा परिस्थितीत समविचारी पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे.''
सपकाळ यांनी सांगितले की, नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांमध्ये औपचारिक घोषणा नसली तरी सातारा, सांगली, मराठवाडा आणि विदर्भात काँग्रेस व रासपने अनेक ठिकाणी एकत्र निवडणुका लढवल्या. या अनुभवातूनच आता महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकांसाठी एकत्र राहण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
त्यांनी पुढे आरोप केला की, ''महायुतीने साम, दाम, दंड, भेद नीतीचा वापर केला. प्रशासन आणि निवडणूक आयोगाचा आधार असूनही काँग्रेस कार्यकर्त्यांनी निष्ठेने संघर्ष केला. त्याचाच परिणाम म्हणजे नगरपालिका निवडणुकांतील काँग्रेसचे यश.''
राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी सांगितले की, ''शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन काम करणाऱ्या समविचारी पक्षांनी एकत्र राहिले पाहिजे. या भावनेतूनच आम्ही राहुल गांधी यांची दिल्लीत भेट घेतली होती. काँग्रेससोबत रासपची आघाडी ३१ मे रोजीच झाली आहे.''
ते पुढे म्हणाले की, ''आज जागा किती मिळणार यापेक्षा संविधान, लोकशाही वाचवणे आणि सामान्य माणसाला मान-सन्मानमिळवून देणे अधिक महत्त्वाचे आहे.''
यावेळी शिवसेनामनसे युतीबाबत विचारले असता हर्षवर्धन सपकाळ यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या असून, ''आम्ही जोडणारे आहोत, तोडणारे नाही,'' असे स्पष्ट केले.

## तिवारीनगरात चोरी

**नागपूर, दि. २४**
तिवारीनगर, भिलगाव येथे राहणाऱ्या अर्चना संजय पुरी (३०) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी सव्वा लाखांचा ऐवज चोरून नेला. सोमवारी सकाळी १०.३० च्या सुमारास आपले घर कुलूपबंद करून अर्चना पुरी या कामावर गेल्या होत्या. ही संधी साधून अज्ञात चोरांनी मुख्य दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला. हॉल व बेडरूममधील लोखंडी कपाटे फोडून त्यात ठेवलेले रोख १४ हजार रुपये आणि सोन्याचांदीचे दागिने असा सव्वा लाखांचा ऐवज चोरून नेला.

## मराठी अस्मितेसाठी नाही, तर पक्ष अस्तित्वासाठी एकत्र : ॲड. आशिष शेलार



**मुंबई, दि. २४**
उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे एकत्र येणे हे मराठी माणसाच्या अस्मितेसाठी नसून स्वतःच्या पक्षांचे अस्तित्व वाचवण्यासाठी आणि सत्तेसाठीचा संधीसाधूपणा आहे, अशी जोरदार टीका भाजप नेते व मंत्री यांनी आज केली. मुंबईतील भाजपा कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी ठाकरे बंधूंवर शब्दांचा मारा करत मुंबईकरांच्या वतीने थेट सवाल उपस्थित केले.
मंत्री शेलार म्हणाले, ''मराठी माणसाने तुम्हाला वेगळे व्हा असे कधी सांगितले नव्हते. मग तेव्हा कशासाठी वेगळे झाला होतात आणि आज कशासाठी एकमेकांच्या गळ्यात गळे घालताय? त्या वेळी 'मातोश्रीवरील विठ्ठलाला बडव्यांनी घेरले, चार कारकून पक्ष चालवत आहेत' असे तुम्हीच म्हणत होतात. आज तेच बडवे आणि तेच कारकून चालणार कसे?''ठाकरे बंधूंच्या पूर्वीच्या वक्तव्यांची आठवण करून देत शेलार म्हणाले की, ''आता मुंबईकर तुमच्यावर 'लाव रे तो व्हिडीओ' करणार आहेत. तुमची जुनी भाषणे बाहेर काढून आरसा समोर धरला जाणार आहे. त्या प्रश्नांची उत्तरं द्यावी लागणार आहेत.'' ते पुढे म्हणाले की, पंतप्रधान , मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना मुंबईकरांनी दिलेल्या भरघोस पाठिंब्यामुळे घाबरलेल्या मनस्थितीतूनच दोन पक्ष एकत्र येत आहेत.युती जाहीर करताना जागावाटप स्पष्ट न केल्यावर शेलार यांनी टोला लगावला.
''आज जागा जाहीर का केल्या नाहीत? भीती वाटतेय का की एक भाऊ दुसऱ्या भावाला फसवत तर नाही ना? असा प्रश्न मुंबईकर विचारत आहेत,'' असे ते म्हणाले.
राज ठाकरे यांच्या 'उमेदवार पळवणाऱ्या टोळ्या' या वक्तव्यावर पलटवार करत शेलार म्हणाले, ''तुमचे निवडून आलेले उमेदवार पळवून नेणारे जे भाऊ बाजूला बसले आहेत, तेच त्या टोळीचे म्होरके आहेत का?''

## जागेच्या वादातून गोळीबार, ५ जखमी



**युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी**
**नागपूर, दि. २४**
जागेच्या वादातून काका आणि पुतण्यामध्ये झालेल्या वादातून गोळीबार करण्यात आल्याची घटना हिंगणा पो. स्टे. अंतर्गत गुमगाव येथे घडली. या गोळीबारात तीनजण जखमी झाले असून जखमींनी केलेल्या मारहाणीत दोघे जखमी झाले.
प्रवीण उर्फ बबलू चंद्रकांत देवतळे, विजय शंकरराव मानावर, नितीन चंद्रकांत देवतळे, नाना जगन्नाथ देवतळे आणि गजानन नाना देवळते अशी जखमींची नावे आहेत.
बुधवारी सकाळी ८.३० च्या सुमारास ही घटना घडली. देवतळे कुटुंबात मागील अनेक दिवसांपासून जागेवरून वाद सुरू होता. घटनेच्या वेळी प्रवीण उर्फ बबलू देवतळे (४०) यांनी त्यांची कार नाना जगन्नाथ देवतळे (८७) यांच्या घरामागील येजा करण्याच्या रस्त्यावर उभी केली होती. त्यावरून त्यांच्यात वाद झाला होता. या वादावादीत प्रवीण आणि नितीन यांनी फावड्याने नाना देवतळे व त्यांचा मुलगा गजानन देवतळे यांना मारहाण करून जखमी केले. या घटनेनंतर संतप्त झालेल्या नानाने घरातून बंदुक आणली आणि प्रवीण व त्याचा मित्र विजय मानावर यांच्यावर गोळ्या झाडल्या. या गोळीबारात प्रवीणच्या पोटावर आणि विजयच्या हाताला गोळ्या लागल्या. नितीनच्या डोक्यावर फावड्याने वार करून त्यालाही जखमी केले.
या घटनेमुळे गुमगावात एकच खळबळ उडाली. गावकऱ्यांनी प्रवीण, विजय आणि नितीन यांना बुटीबोरी येथील माया हॉस्पिटल येथे दाखल केले, तर नाना आणि गजानन यांना एम्समध्ये भरती केले. घटनेची माहिती समजताच परिमंडळ १ चे पोलिस उपायुक्त सिंगा रेड्डी ऋषीकेश रेड्डी, सहायक पोलिस आयुक्त सतीशकुमार गुरव, हिंगण्याचे पो. नि. जितेंद्र बोबडे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळ गाठले. याप्रकरणी हिंगणा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## रिपब्लिकन फेडरेशन निवडणुकीत उतरणार

**नागपूर, दि. २४**
पुढील महिन्यात होणाऱ्या नागपूर महापालिकेच्या निवडणुकीत रिपब्लिकन फेडरेशन उतरणार असल्याचे मुख्य संयोजक मिलिंद पखाले यांनी प्रसिद्धीला दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.
आंबेडकरी राजकारणाचे वर्चस्व नागपूर महापालिकेत अनेक वर्षे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना उपेक्षित राजकारण होते. त्या राजकारणाची पुर्नउभारणी लोकांच्या सहभागातून आणि सहकार्यातून रिपब्लिकन फेडरेशन पुढे आले आहे. लोकांच्या आग्रहास्तव फेडरेशनच्या वतीने प्रभाग क्र. १, २, ६, ७, ९, १२, १७, ३३, ३४, ३५ येथे उमेदवार उभे करणार आहेत असेही पखाले यांनी म्हटले आहे.

## ट्रकच्या धडकेने महिलेचा मृत्यू

**नागपूर, दि. २४**
ट्रकची धडक बसल्याने पाचझोपडा, मिनीमातानगर येथे राहणाऱ्या सपना महेश मार्कंडे (३२) या सायकलस्वार महिलेचा मृत्यू झाला. मंगळवारी दुपारी ४.३० च्या सुमारास सपना मार्कंडे या सायकलने जात होत्या. डिप्टी सिग्नल मार्गावरील रेल्वे क्रॉसिंगजवळून जात असताना एमएच ४० सीटी ९५९६ क्रमांकाच्या ट्रकचालकाने सपनाला धडक दिली.

## पत्रकार परिषद ठाकरे बंधूंची; पण चर्चा मात्र राज ठाकरेंची

**मुंबई, दि. २४**
शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसेच्या युतीच्या घोषणेसाठी आयोजित संयुक्त पत्रकार परिषद ठाकरे बंधूंची असली, तरी संपूर्ण चर्चेचा केंद्रबिंदू मात्र मनसे प्रमुख ठरले. आपल्या नेहमीच्या आक्रमक, हजरजबाबी आणि टोलेबाज शैलीत राज ठाकरेंनी दिलेल्या उत्तरांनी विरोधकांना अस्वस्थ केलं, तर काही क्षणांतच हेही झाकोळले गेले, अशी राजकीय चर्चा रंगली आहे.
राजकीय वर्तुळात कायम चर्चेत राहणारे राज ठाकरे सभा असो वा पत्रकार परिषदआपली ठसठशीत छाप सोडतातच. या संयुक्त पत्रकार परिषदेतही तसंच घडलं. अनेक प्रश्नांवर राज यांनी थेट 'बॅटिंग' घेत विरोधकांवर निशाणा साधला. या पार्श्वभूमीवर राज ठाकरेंच्या पाच उत्तरांचा विशेष उल्लेख केला जात आहे.
मुंबईचा महापौर कोणाचा? या प्रश्नावर राज ठाकरे यांनी कोणताही संदिग्धपणा न ठेवता सांगितले ''मुंबईचा महापौर मराठीच असेल आणि तो आमचाच असेल.''
याच उत्तरासोबत त्यांनी शिवसेनामनसे युतीची अधिकृत घोषणा करताच सभागृहात शिवसैनिक व मनसैनिकांकडून जल्लोष झाला. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेला आज पूर्णविराम मिळाल्याचा हा क्षण असल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.
युतीनंतर सर्वाधिक उत्सुकता असलेला प्रश्नजागावाटप. पत्रकारांनी प्रश्न विचारण्याआधीच राज ठाकरे म्हणाले.

## २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित

### राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

**मुंबई प्रतिनिधी**
राज्यातील जिल्हा परिषदांतर्गत आरोग्य विभागामध्ये कार्यरत आणि सेवानिवृत्त झालेल्या बंधपत्रित २९१ आरोग्य सेविकांच्या नियुक्त्या नियमित करण्याबाबत विभागीय आयुक्तांना अधिकार देण्याचा निर्णय बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.
या निर्णयानुसार जिल्हा परिषदांतर्गत महिला आरोग्य सेवकांची पदे ही सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारित संचालक, आरोग्य सेवा संचालनालयामार्फत शासकीय परिचर्या महाविद्यालयातून प्रशिक्षण घेतलेल्या उमेदवारांमधून २ वर्षाच्या कालावधीसाठी भरण्यात येत असत. हा कालावधी संपल्यानंतर या उमेदवारांना कार्यमुक्त केले जात असे. त्यानंतर संबंधित जिल्ह्यातील रुग्णसेवेची निकड आणि जिल्ह्यातील रिक्त पदांची स्थिती लक्षात घेता त्यांना ११ महिन्यांची अस्थायी नियुक्ती देण्याचे अधिकार विभागीय आयुक्तांना होते. विभागीय आयुक्तांचा हा अधिकार सन २०१८ मध्ये रद्द करण्यात आला होता.
आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य विभागात १५ एप्रिल २०१५ पूर्वी नियुक्त झालेल्या तसेच सेवानिवृत्त झालेल्या आणि सध्या कार्यरत अशा २९१ बंधपत्रित आरोग्य सेविका यांच्या सेवा नियमित करण्याबाबतचे अधिकार विभागीय आयुक्त यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला.
ग्राम, तालुका, जिल्हा प्रशासनाच्या सक्षमीकरणासाठी कर्मयोगी २.० ग्राम, तालुका आणि जिल्हास्तरावर विकासाभिमुख कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी राज्यात जिल्हा कर्मयोगी कार्यक्रम २.० तसेच राज्यातील सरपंचांच्या क्षमता विकसित करण्यासाठी सरपंच संवाद कार्यक्रम राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. हे दोन्ही कार्यक्रम मित्रा संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात येतील.
जिल्हा कर्मयोगी २.० कार्यक्रम गाव, तालुका आणि जिल्हा अशा स्तरांवर राबविण्यात येईल. यात सेवा देणाऱ्या थेट संबंधित अधिकाऱ्यांपासून ते स्थानिक प्रशासनातील शेवटच्या टप्प्यातील अधिकारी, कर्मचारी यांचे कौशल्य वाढविण्यात येणार आहे. यातून जिल्ह्याचा जीडीपी वाढविण्याकरिता सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग औद्योगिक युनीट्स तसेच शेतकरी उत्पादक संघटना - एफपीओज्? यांसारख्या कृषि -संबंधित आर्थिक घटकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.
जिल्हा स्तरावर शासन-ते-व्यवसाय सेवा सुधारणेवर भर दिला जाईल. विविध विभागांमधील सहकार्य वाढवून डेटा संकलन, समन्वय आणि निर्णय प्रक्रियेमधील सहभागाला प्रोत्साहन दिले.







दैनिक युवाराष्ट्र दर्शन
३
# यवतमाळ
गुरुवार, २५ डिसेंबर २०२५
जिल्हा

## बँकेत दावा न केलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी विशेष मोहिम

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दि. २४ डिसेंबर

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शनात बँकेत दावा न केलेल्या ठेवी संबंधितांना परत मिळण्यासाठी विशेष मोहिम सर्व बँकांमध्ये राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने जिल्हा अग्रणी बँकेतर्फे दि. २९ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजता नियोजनभवनात विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दहा वर्षांपेक्षा अधिक काळ बँक, पेंशन, विमा, शेअर, म्युच्युअल फंड आदी ठिकाणी जमा राहिलेल्या व व्यवहार न झालेल्या रकमा रिझर्व्ह बँकेच्या ठेवीदार शिक्षण व जागरूकता निधीमध्ये जमा केल्या जातात. या मोहिमेअंतर्गत अशा बेवारस ठेवी खातेदारांना किंवा त्यांच्या वारसांना परत देण्यात येणार आहेत. दावा करण्यासाठी नागरिकांनी उद्गम पोर्टल किंवा संबंधित बँक/संस्थेच्या संकेतस्थळावर नाव तपासून आवश्यक कागदपत्रांसह खाते क्रमांक, केवायसी इ. संबंधित बँकेत अर्ज करावा.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरूमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

# प्रभाग 23 (अ) ची निवडणूक पुन्हा घ्यावी

## ईव्हीएम बदलावर संशय : विनोद दोंदल यांची जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून मागणी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ डिसेंबर

निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह उभे करणाऱ्या प्रकारामुळे यवतमाळ नगर पालिकेच्या प्रभाग क्रमांक २३ (अ) मधील निवडणूक पुन्हा घ्यावी, अशी ठाम मागणी वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार विनोद दोंदल यांनी केली आहे. मतदानादरम्यान ईव्हीएम मशीन बंद पडून परस्पर बदलण्यात आल्याचा आरोप करत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.



विनोद मोहनराव दोंदल आणि निवडणूक प्रक्रियेस जबाबदार अधिकारी यांच्याशी संबंधित हा प्रकार शनिवार, २० डिसेंबर २०२५ रोजी घडल्याचा दावा करण्यात आला आहे. यवतमाळ पब्लिक स्कूलमधील रूम क्रमांक ६ येथील मतदान केंद्रावर सकाळी ८ ते ११ या वेळेत ईव्हीएम मशीनचे बटण काम न केल्याने मशीन दोन वेळा बंद पडली. मात्र, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींना विश्वासात न घेता बाहेरून नवीन ईव्हीएम आणून मशीन बदलण्यात आल्याचा गंभीर आरोप दोंदल यांनी केला आहे.

या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान स्वतः उमेदवार किंवा अधिकृत प्रतिनिधी उपस्थित नसताना ईव्हीएम बदलण्यात आल्याने निवडणुकीच्या पारदर्शकतेवर मोठे प्रश्न निर्माण झाले आहेत. आपल्या प्रभागातील अनेक मतदारांनी मतदान केल्याचा दावा असतांनाही निकालात केवळ ११९ मते मिळाल्याचे दाखविण्यात आल्याने ईव्हीएमवर शंकेची सुई फिरली आहे. सदर प्रकरणात झोनल अधिकारी व अधिनस्त कर्मचाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून, त्यांच्यावर तात्काळ चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच, सकाळी ८ ते ११ या कालावधीत मतदान केंद्रावर बाहेरून ईव्हीएम आणताना झालेले सर्व प्रकार सीसीटीव्ही फुटेजद्वारे स्पष्ट होतील, म्हणून ते फुटेज उपलब्ध करून देण्याची मागणी दोंदल यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. निवडणूक प्रक्रियेवर जनतेचा विश्वास टिकून राहण्यासाठी प्रभाग २३ (अ) ची निवडणूक ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर नव्याने घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाकडून दखल न घेतल्यास न्यायालयात दाद मागण्याचा इशाराही उमेदवाराकडून देण्यात आला आहे.

### ....अन्यथा न्यायालयात जाणार

**दि. २० डिसेंबर २०२५ ला सकाळी ८ ते ११ वेळेस जेंव्हा बाहेरुन ई. व्ही. एम मशीन मतदान केंद्रावर आणल्या गेल्या व बटन दबत नसल्यामुळे बंद पडलेल्या ईव्हीएम मशीन च्या जागेवर दुसऱ्या ईव्हीएम मशीन लावण्यात आली त्या सर्वांचे CC TV चे व्हिडीओ शूटिंग मला उपलब्ध करून देण्यात यावे जनेकरून मला तातडीने न्यायलयीन प्रक्रियेसाठी न्यायालयात दाद मागता येईल ही विनंती...**



## न.प.निवडणुकीमध्ये विजयी वृत्तपत्र विक्रेता व स्नेहीचा सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ डिसेंबर

जिल्हा वृत्तपत्र विक्रेता संस्थेमार्फत दिनांक 23 डिसेंबर 2025 ला सकाळी 7 वाजता. नवनिर्वाचित नगरसेवक वृत्तपत्र वितरण करणारे वॉर्ड नंबर 5 आकाश परतेकी तसेच वॉर्ड नंबर 10 चे निरज वाघमारे, वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे स्नेही वार्ड नंबर 16 शेख चांद व वॉर्ड नंबर 17 चे भारत ब्राम्हणकर यांचा सत्कार घेण्यात आले.यावेळी सत्कार उत्तर देताना सर्वच सदस्यांनी संस्थाला मदत करण्याची तयारी दाखवली. मान्यवरांचा सत्कार संस्थेचे अध्यक्ष अशोक शिंदे सचिव किरण कोरडे मार्गदर्शक मदन केळापुरे, उपाध्यक्ष राजु हनवते, प्रविण आगलावे, संतोष शिरभाते, धर्मेंद्र मुणोत, किशोर भेदरकर, विजय हनवते, कमलनयन कोठारी, श्रीपाद तोटे अभिजीत ठाकरेंसह मोठ्या प्रमाणात सदस्यगण उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन श्रीराम खत्री व आभार प्रदर्शन किरण कोरडे यांनी केले.

## संक्षिप्त

### नियोजित बालविवाह थांबविण्यात जिल्हा प्रशासनास यश

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ, राळेगाव तालुक्यात गोपालनगर परिसरात होऊ घातलेले दोन बालविवाह जिल्हा प्रशासनाने वेळेवर हस्तक्षेप करून यशस्वीपणे थांबविले. दिनांक २३ डिसेंबर रोजी चाईल्ड हेल्पलाईन १०९८ वर प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीनुसार ही कार्यवाही करण्यात आली. प्राप्त माहितीनुसार दोन बालकांचे वेगवेगळ्या ठिकाणी विवाह होणार होते. अंगणवाडी सेविकेकडील नोंदींच्या आधारे दोन्ही बालकांचे वय १६ वर्षे असल्याचे स्पष्ट झाले. बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ नुसार बालिकेसाठी किमान १८ वर्षे व बालकासाठी २१ वर्षे वय आवश्यक असल्याने सदर विवाह बालविवाह ठरत असल्याचे निदर्शनास आले. जिल्हा चाईल्ड हेल्पलाईन यवतमाळचे केसवर्कर शुभम दत्ता कोंडलवार व अश्विनी दिलीप नासरे यांनी गाव बाल संरक्षण समिती, अंगणवाडी सेविका सरला आडे, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच तसेच राळेगाव पोलीस स्टेशनच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने सदर बालविवाह तत्काळ थांबविला.

### विधी संघर्षग्रस्त बालकांना व्यवसाय प्रशिक्षण व मार्गदर्शन

यवतमाळ: विधी संघर्षग्रस्त बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जिल्हा बाल संरक्षण कक्ष आणि बाल न्याय मंडळ, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन कार्यशाळा' आयोजित करण्यात आली होती.

## आसेगाव देवी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत बांधला वनराई बंधारा

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ डिसेंबर

बाभूळगाव पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या आसेगाव देवी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात आलेले आहे या उपक्रमाचा एक भाग म्हणून ग्रामपंचायत तर्फे यावली रोडवरील नाल्यावर श्रमदानातून वनराई बंधारा बांधण्यात आला.



ग्रामपंचायतीने पाणी आडवा पाणी जिरवा या उद्देशाखाली जमिनीची पाण्याची पातळी वाढवण्याचे दृष्टीने वेगवेगळे ठिकाणी बंधारे बांधले आहे. यावेळी बाभुळगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी ढोले, विस्तार अधिकारी हेडाऊ, लांजेकर, सहाय्यक गटविकास अधिकारी दत्तात्रय तंबलवाड,सरपंच सचिन चव्हाण,ग्रा.प अधिकारी ओंकेश कावलकर ,ग्रामपंचायत सदस्य सुभाष ताबडू,महसूल विभागाचे महसूल सहाय्यक गडपायले,जिल्हा परिषदेचे शिक्षक शिक्षक राऊत, विद्यार्थी,आशा सेवीका कृषी सहायक, दातारकर कृषी सखी ग्रामपंचायत चे सर्व कर्मचारी व ग्राम स्तरावरील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## स्वबळावर राष्ट्रवादीने जिंकल्या आठ जागा

•युवाराष्ट्र दर्शन तालुका प्रतिनिधी आर्णी परवेज बेग

आर्णी नगर परिषद निवडणूकीत सर्वच प्रमूख पक्षानी स्वबळावर निवडणूक लढवली होती, कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व खासदार प्रतिभा धानोरकर, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार ख्याजा बेग, माजी नगराध्यक्ष आरीज बेग यांनी करुन कॉंग्रेसपक्षाचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार नालंदा भरणे सह आठ नगरसेवक कॉंग्रेसने निवडून आणले तर दूसरीकडे पंधरा दिवसाआधी राष्ट्रवादी अजित पवार गटात साजिद बेग यांनी कार्यकर्त्यासह प्रवेश घेवून नगर परीषद निवडणूकीत स्वबळावर आठ नगरसेवक निवडून आणल्याने कॉंग्रेसच्या तूलनेत एकट्या साजिद बेगने आठ जागा जिकल्याने साजिद बेग नगर परिषद निवडणूकीत कींगमेकर असल्याचे राजकीय वर्तूळात बोलल्या जात आहे, आर्णी नगर परिषद निवडणूकीत स्वबळावर ही निवडणूक सर्वच पक्षानी लढवली होती नगराध्यक्षासह सर्वच उमेदवार निवडून आण्याचे ध्येय धोरण आपआपल्या पक्षातील नेतेमंडळीचे होते त्याच दुष्टीकोणातुन प्रचार रंगधार ठरला होता,कॉंग्रेस पक्षाचे नेतृत्व खासदार प्रतिभा धानोरकर,माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार ख्याजा बेग,माजी नगराध्यक्ष आरीज बेग यांनी केले कॉंग्रेस नेते मंडळीने नगराध्यक्षासह आठ नगरसेवक निवडून आणले तर 28 ऑक्टोंबर 2025 ला मुंबई राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी(अजित पवार गट) मध्ये कार्यकर्त्यासह साजिद बेग यांनी पक्ष प्रवेश घेतला आणी ता. 17 नोव्हेंबर 2025 ही नगर परिषद उमेदवाराचे नामाकंत दाखल करण्याची शेवटची तारीख होती, साजिद बेग यांची ता. 29 ऑक्टोबरला महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या सरचिटणीस पदी नियूक्ती मिळाली पक्ष प्रवेशा नंतर साजिद बेग यांना फक्त विस दिवसात नगर परिषद निवडणूकीचे रिंगण उमेदवारानी भरुन दिले साजिद बेग यांनी स्वत:च्या भरोश्यावर नगराध्यक्ष पदासह विस नगरसेवक उमेदवाराची धूरा स्वत: संभाळली सोबत कोणता ही मोठा नेता नाही, पक्षाचे पदधिकारी नाही एकटा वा-यासारखा प्रत्येक प्रभागात फिरुन उमेदवाराचा प्रचार केला दूसरीकडे शिंदे शिवसेनेच्या प्रचारात पालकमंत्री संजय राठोड यांनी आर्णीत सभा घेतली ,भाजप उमेदवाराच्या प्रचारात स्थानिक भाजपा आमदार राजू तोडसाम होते,उबाठा शिवसेना प्रचारात खासदार संजय देशमूख यांची आर्णीत मोटर सायकल रॅली व सभा झाली प्रचारात माजी आमदार बाळासाहेब मूनगीनवार,जिल्हा प्रमूख प्रविण शिंदे होते,तसेच कॉंग्रेसच्या प्रचारात खासदार प्रतिभा धानोरकर,माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी आमदार ख्वाजा बेग, माजी नगराध्यक्ष आरीज बेग होते परंतू या राष्ट्रवादी (अजित पवार गट) उमेदवाराच्या प्रचारात आपल्या स्थानिक कार्यकर्त्याना सोबत घेवून साजिद बेग होते,



## नगर वाचनालयात साने गुरुजींची जयंती



•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. २४ डिसेंबर

आज साने गुरुजींच्या जयंती निमित्त नगर वाचनालयाच्या प्रांगणात साने गुरुजींची जयंती साजरी करण्यात आली.

या प्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष संजीवरेड्डी बोदकुरवार व नवनिर्वाचित अध्यक्ष विद्याताई खेमराज आत्राम यांच्या हस्ते हारार्पन करण्यात आले. याप्रसंगी वाचनालयाचे सचिव गजानन कासावार यांनी साने गुरुजी यांच्या जीवनावर प्रकाश टाकून त्यांनी सांगितलेल्या मार्गावर चालण्याची आवश्यकता प्रतिपादित केली.

या छोटेखानी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विदर्भ साहित्य संघाचे सचिव अभिजित अणे यांनी केले. आभार प्रदर्शन वाचनालयाचे संचालक हरिहर भागवत यांनी केले. या प्रसंगी वाचनालयाचे उपाध्यक्ष विशाल झाडे, सचिन आत्राम, विदर्भ साहित्य संघाचे अशोक सोनटक्के, गजानन भगत, वैजनाथ खडसे, देवेंद्र भाजीपाले, प्रमोद लोणारे, राम मेंगावार प्रामुख्याने उपस्थित होते.

## रघुनाथ सिडाम यांची अध्यक्ष पदी निवड

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पांढरकवडा, दि. २४ डिसेंबर



येथिल एस टी महामंडळ येथील कार्यरत रघुनाथ देविदास सिडाम (मार्धाजुनकर) यांची आदिवासी प्रधान समाज मित्र परिवार पांढरकवडा या संघटनेची अध्यक्ष पदी एकमुखाने निवड करण्यात आली मागिल वर्षापासुन ही संघटना आदिवासी समाजच्या ग्रामिण भागातील आदिवासी प्रधान समाजातील गोर गरिब मजुरदार मुला मुलिंचे विवाह करिता परिचय मेळावाचे आयोजन करतात आणी म्हणून या वर्षी रघुनाथ सिडाम ची निवड केली आहे तर उपाध्यक्ष जिवन मेश्राम व सचिव सुनिल आडे याची निवड करण्यात आली व ईतर २० सदस्य घेण्यात आले असल्याची माहिती सचिव सुनिल आडे यांनी दिली आहे

## प.पू. सद्गुरु नारायण महाराज जयंती कार्यक्रमाचे आयोजन!

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, उमरखेड, दि. २४ डिसेंबर

शक्ती ब्रम्हाश्रमचे संस्थापक सदगुरु समर्थ नारायण महाराज यांचा जयंती उत्सव गुणवंत महाराज यांच्या उपस्थितीत साजरा केला जाणार आहे. आज २५ व उद्या २६ डिसेंबर रोजी उत्सव समितीच्यावतीने स्थानिक गोचर स्वामी वॉर्ड येथे अरविंद ओझलवार यांचे घरी हे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन शिष्य मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे. शक्ती ब्रम्हाश्रमचे संस्थापक सदगुरु समर्थ नारायण महाराज यांच्या जयंतीनिमित्त उमरखेड येथे २५ व २६ डिसेंबर असे दोन दिवस



!! सद्गुरु समर्थ नारायण महाराज !!

धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २५ डिसेंबर रोजी सायंकाळी पाच वाजता प्रार्थना, रात्री ९ वाजता सार्वजनिक भजन कार्यक्रम होणार आहे. तर २६ डिसेंबर जयंतीच्या दिवशी सकाळी पाच वाजता प्रातः प्रार्थना, सकाळी सात वाजता गायत्री हवन, सकाळी नऊ वाजता गुरुपूजन तसेच १० ते १२ वाजता सद्गुरूंचे भजन त्यानंतर महाआरती व महाआरतीनंतर दुपारी महाप्रसादाचा कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ वाजता प्रार्थनेने कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ भाविक भक्तांनी घ्यावा, असे आवाहन येथील सद्गुरु नारायण महाराज यांच्या समस्त शिष्य मंडळींच्या वतीने करण्यात आले आहे.

## तिबेट-भारत संबंध आणि आंबेडकरी विचारांवर व्याख्यान आज

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. २४ डिसेंबर

तिबेट-भारत संबंध व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर आधारित एक महत्त्वपूर्ण व प्रबोधनात्मक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या समता सैनिक दल (SSD) यवतमाळ शाखेच्या वतीने तसेच नवी दिल्ली येथील भारत तिबेट समन्वय केंद्र (इंडिया टिबेट कोऑर्डिनेशन ऑफिस - ITCO) यांच्या संयुक्त विद्यमाने हे जाहीर व्याख्यान होणार आहे. हा कार्यक्रम बुधवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजता वाघापूर यवतमाळ येथील रमाई सांस्कृतिक भवन येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात 'तिबेट आणि भारत यांचे ऐतिहासिक संबंध' या विषयावर ताशी देकी (समन्वयक, भारत तिबेट समन्वय कार्यालय, नवी दिल्ली) मार्गदर्शन करणार आहेत. तर 'तिबेट आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका' या विषयावर प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते धम्मा कांबळे (यवतमाळ) आपले विचार मांडणार आहेत. कार्यक्रमाच्या सत्कारमूर्ती म्हणून मीरा रामदास वीर (अध्यक्ष, धम्मज्योती महिला मंडळ, वाघापूर) उपस्थित राहणार असून, रामदास बनकर (अध्यक्ष, भीमज्योती चॅरिटेबल ट्रस्ट, यवतमाळ) आणि अशोक ताकसांडे (अध्यक्ष, समता सैनिक दल, यवतमाळ) हे प्रमुख अतिथी म्हणून लाभणार आहेत.

# हमाली करणारा युवक झाला नगरसेवक

### हमालाने केली कमाल

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी, दि. २४ डिसेंबर

नशिबाचे चक्र कधी कसे फिरेल हे कुणालाही सांगता येत नाही. एका रात्रीमध्ये ही अनेकांचे भाग्य उजळण्याचे आपण नेहमीच पाहत आणि ऐकत आलो आहे. असेच ढाणकी शहरातील हमाली करणाऱ्या रविशंकर गुणाजी ढोबळे चे नशीब उजळले आणि तो चक्क नगरसेवक झाला. घरची परिस्थिती बेताची , वडीलही हमाली करणारेच, त्यामुळे कुटुंबाचा भार रविशंकर च्या खांद्यावर आला. त्यामुळे त्यांनीही हमाली करण्याचा निर्णय घेतला. शिक्षण कमी असल्याने इतर कामे मिळणे मुश्किल झाले होते. अशावेळी परिस्थितीचा बाऊ न करता सन्मानाणे तो हमालीचे काम करू लागला. सर्वांशी मिळून मिसळून राहणे, प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणे हा रविशंकर चा स्वभाव. या स्वभावामुळेच टेंभेश्वर नगर परिसरामध्ये रवी शंकर सर्वपरिचित होता. शांत स्वभावामुळे आणि सर्वांच्या मदतीला धावून जाण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे येथील नागरिकांनी त्याला थेट नगरसेवक पदावर विराजमान केले. ढाणकी च्या राजकारणात नव्यानेच शिवसेना शिंदे गटाने आगमन केले. नगरपंचायत निवडणुकीच्या रणधुमाळीत शिंदे सेनेने नवयुवकांना पसंती दिली आणि रविशंकर ढोबळे याला पक्षाची उमेदवारी घोषित केली. रविशंकर जवळ त्याचे स्वभावच भांडवल असल्याने नागरिकांनीही त्याला भरभरून मते दिली आणि भरघोस मतांनी निवडून दिले. निवडणूक जिंकल्यावरही रविशंकर अभिमानाने सांगतो की मी माझे काम कायमच करत राहील आणि माझी जनसेवा ही अशीच निरंतर चालू राहील.



# तरुणावर चाकू हल्ला

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, दि. २४ डिसेंबर

बोथ बोडण गावात एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला करण्यात आल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून, याप्रकरणी लाडखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिनांक 22 डिसेंबर 2025 रोजी सायंकाळी साडेसात वाजता नितीन बक्षी चव्हाण हा नातेवाईक अमीत राठोड याच्यासोबत घरात बसलेला असतांना आरोपी गजानन मोहन पवार रा. बोथ बोडण याने त्याला घराबाहेर बोलावले. दोन दिवसांपूर्वी लोकांमध्ये माझ्याबाबत काय बोलत होता, असे म्हणत आरोपीने वाद घातला.वादाच्या दरम्यान आरोपीने जवळील चाकू काढून जिवे मारण्याच्या उद्देशाने



नितीन चव्हाण यांच्या पोटावर व हातावर वार केले, यात ते गंभीर जखमी झाले घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली

या प्रकरणी फिर्यादी जखमी नितीन चव्हाणचा भाऊ मनोज बक्षी चव्हाण यांच्या जबानी रिपोर्टवरून 23 डिसेंबर रोजी लाडखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून जखमीवर उपचार सुरू आहेत.

## कन्स्ट्रक्शनमधून सहा बॅटरींची चोरी

•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ

ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत भोयर येथील चिद्दरवार कन्स्ट्रक्शन मधून ३०,००० रुपये किंमतीच्या सहा बॅटरी चोरीला गेल्याची घटना घडली आहे. फिर्यादी गजानन रामभाऊ बोरकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २२ डिसेंबरच्या सकाळी ७ वाजेपूर्वी अज्ञात आरोपीने त्यांच्या तीन वाहनांमधून प्रत्येकी दोन अशा सहा 'एक्साईड' कंपनीच्या बॅटरी चोरून नेल्या. यात ट्रॅन्जेक्शन वाहन (MH 29 T 0329), हायवा (MH 40-6414) आणि एका रोड रोलरचा समावेश आहे. पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे.

युवाराष्ट्र दर्शन
भंडारा जिल्हा
गुरूवार दि.२५ डिसेंबर २०२५

## मकरधोकडा येथे शेतातील लाखोंच्या झाडांची सर्रास कत्तल

**भंडारा :** तालुक्यातील टेकेपार येथील शेतकरी शालीकराम चेपा पडोळे (हल्ली मुक्काम सिल्ली) यांची गट क्र. १७२, १७८/१ व १७३/१ असे तीन गटात मकरधोकडा हद्दीत शेती आहे. शेतावर जुनी आणि मोठी अशी लाखों रुपयाची झाडे होती. मात्र सर्वच्या सर्व १० झाडे अज्ञातानी तोडून नेल्याची बाब उघडकीस आली. झाडे कोणी तोडली? याचा तपास करून तोडलेली झाडे परत मिळण्यासाठी पिडीत शेतकरी यांनी वन विभाग कार्यालय तसेच पोलीस स्टेशन कारधा येथे तक्रार दाखल केली आहे. मात्र तपास अत्यंत कासवगतीने सुरू असल्याने शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

शालिकराम पडोळे हे वयोवृद्ध असून रोज शेतावर जात नाही. हीच संधी साधून काही अज्ञातानी शेतावरील सागवन - २, खैर - ४, किन्ही -३, बाभूळ - १ अशी एकूण १० झाडे तीही मोठी झाडे तोडून नेली, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.याबाबत १६ डिसेंबरला वनपरिक्षेत्राधिकारी व वनपरिक्षेत्र वन विभाग भंडारा यांना तसेच पोलीस स्टेशन कारधा येथे रीतसर तक्रार दाखल केली. मात्र झाडे कोणी तोडली याचा अद्यापही थांगपत्ता लागला नाही.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२



# कार अपघातात
# १ ठार, १ जखमी
## गुंजेपार फाट्याजवळील घटना

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** भरधाव कारवरील नियंत्रण सूटल्याने झालेल्या अपघातात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला. सदर घटना सोमवार, २२ रोजी मध्यरात्री १.३० वाजताच्या सुमारास भंडारा-खात रोडवरील गुंजेपार फाटा परिसरात घडली. रोहित प्रदीप शर्मा (२५) रा. सिव्हिल लाईन भंडारा असे मृत तरुणाचे नाव आहे. तर हरीश खुशाल सूर्यवंशी (३२) रा. प्रगती कॉलनी भंडारा हा जखमी झाला.

हरीश सुर्यवंशी व रोहित शर्मा हे गुंजेपार येथील हॉटेलमधून कारने घरी जाण्याकरिता निघाले होते. यावेळी रात्री दीड वाजताच्या सुमारास गुंजेपार फाटयाजवळ रोहीतचे कारवरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्त्याच्या खाली पलटले. यात रोहितच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. तर बाजूच्या सीटवर बसलेला हरीष हा थोडक्यात बचावला.घटनेची माहिती मिळताच भंडारा पोलिसांनी घटनास्थळी पोहचून पंचनामा केला व मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात असून अधिक तपास पोलिस उपनिरीक्षक वानखेडे करीत आहेत.

# उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण यंत्र बंदच
## तुमसर येथील प्रकार, खासगी रुग्णालयात रुग्णांना बसतो आर्थिक फटका





**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**तुमसर :** तुमसर येथील सुभाषचंद्र बोस शासकीय उपजिल्हा रुग्णालयातील क्ष-किरण (एक्स-रे) यंत्र अनेक दिवसांपासून ठप्प आहे. विद्युत दाब जास्त प्रमाणात झाल्यामुळे क्ष-किरण यंत्रमध्ये बिघाड झाला. त्यामुळे रुग्णांना खासगी दवाखान्यात जाऊन क्ष-किरण काढावे लागते. यात त्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे.

जनतेच्या आरोग्य सेवेसाठी शासन मोठमोठे दावे करते. परंतु, तुमसर उपजिल्हा रुग्णालयातील वास्तव त्या सर्व घोषणांची पोलखोल करणारे ठरते आहे. क्ष-किरण यंत्र दुरुस्ती करण्यासाठी कोणतेही तज्ज्ञ कर्मचारी गेल्या पंधरा दिवसांपासून आले नाही त्यामुळे आजही ती मशीन सुरू न झाल्याने रुग्णालयातील एक्स-रे विभाग बंदच आहे.

संबंधित कंपनी आणि आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे जनतेला यातून मोठा फटका बसतो आहे. शेकडो रुग्ण एक्स-रे साठी येतात. परंतु, त्यांना रिकाम्या हाताने परत जावे लागते. काहींना खासगी दवाखान्यात जावे लागते. तिथे त्यांच्याकडून अधिकचे शुल्क वसुल केले जाते. गरीब आणि ग्रामीण भागातील रुग्णांसाठी ही परिस्थिती अधिकच वेदनादायक आहे.

रुग्णालयात रुग्णांची एक्स-रे काढण्यासाठी दररोज गर्दी होत असते. पण उपाय सापडत नसल्याने रुग्ण आणि रुग्णांच्या नातेवाइकांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. जिल्हा प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून मशीन सुरू करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, रुग्णालय प्रशासन मात्र नेहमीच्या 'लवकरच सुरू होईल' अशा उत्तरावरच थांबले आहे. परंतु ही 'लवकरच' ची भूमिका अनेक दिवसांपासून सुरू आहे.

देव्हाडी प्राथमिक आरोग्य केंद्रातून तपासणी केल्यानंतर डॉक्टरांनी एक्सरे काढण्यासाठी सांगितले परंतु उपजिल्हा रुग्णालयात आल्यानंतर येथील एक्सरे मशीन बंद असल्याचे सांगितले त्यामुळे खाजगी रुग्णालयात जाऊन एक्सरे काढावे लागले.

**-देवराव वहिले,** बाम्हणी, तालुका तुमसर, जिल्हा भंडारा.

विद्युत दाब जास्त प्रमाणात झाल्याने क्ष-किरण यंत्रमध्ये बिघाड झाला आहे. त्याचा दुरुस्तीसाठी कंपनीचे टेक्निकल यांना संपर्क साधला आहे, त्यांनी लवकरच रुग्णालयात येऊन ती मशीन दुरुस्ती करणार असल्याची माहिती दिली आहे.

**-नितीन मीसुरकर,** वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, तुमसर.

## तरुणाचा अपघाती मृत्यू



**तुमसर :** तालुक्यातील आसलपाणी येथील अजय अशोक चव्हाण वय २३ वर्ष हा तरुण नागपूर वरुन आपल्या मोटारसायकल ने गावाकडे येत असतात एका अज्ञात वाहनाने अजयच्या मोटार सायकलला धडक देऊन पसार झाला.

अपघातात अजय याचा जागीच मृत्यू झाला अजयचे आई वडील अगोदरच मरण पावले आहेत त्याला दोन बहिणी असुन तो बहीणीकडे राहायचा.

## समाजमनाला दिशा देणारा विचारवंत हरपला

डॉ. उल्हासजी फडके यांचे नुकतेच झालेले निधन ही घटना केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची नसून, विचार, अभ्यास आणि मूल्याधिष्ठित कार्य यांचा एक अखंड प्रवास थांबण्यासारखी आहे. विद्वत्ता, तत्त्वनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशील माणुसकी यांचे दुर्मीळ संमिश्रण असलेले हे व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. त्यांचे जाणे शैक्षणिक, सामाजिक, वैचारिक आणि सार्वजनिक जीवनासाठी मोठी पोकळी निर्माण करणारे आहे.



डॉ. फडके हे मूळचे अभ्यासक होते. कोणताही विषय असो, तो सखोल अभ्यासाशिवाय मांडणे ही त्यांची पद्धत नव्हती. जनसंघाच्या काळापासून ते भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ राहिले. राजकारण त्यांनी कधीही सत्तेचे साधन मानले नाही; तर ते राष्ट्रसेवेचे आणि समाजजागृतीचे प्रभावी माध्यम आहे, असा त्यांचा ठाम विश्वास होता. संघटन, विचार आणि कार्य यांचा समन्वय साधत त्यांनी भाजपच्या वैचारिक अधिष्ठानाशी अखेरपर्यंत निष्ठा राखली.

शैक्षणिक क्षेत्रात डॉ. उल्हासजी फडके यांची ओळख एक परखड विचारवंत आणि आदर्श मार्गदर्शक म्हणून होती. शिक्षण म्हणजे केवळ पदवी मिळवणे नव्हे, तर व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे, असे ते नेहमी सांगत. याच भूमिकेतून त्यांनी शिक्षक आघाडी, विविध शैक्षणिक संघटना आणि शिक्षणविषयक चळवळींमध्ये सक्रिय योगदान दिले. शिक्षकांच्या समस्या, अभ्यासक्रमातील बदल, शिक्षणाची गुणवत्ता आणि मूल्याधिष्ठित शिक्षण यावर त्यांनी सातत्याने अभ्यासपूर्ण भूमिका मांडली.

डॉ. फडके हे उत्तम लेखकही होते. विविध विषयांवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांच्या लेखनात विषयाची सखोल मांडणी, संदर्भांची अचूकता आणि भाषेतील स्पष्टता दिसून येते. विद्यार्थी, शिक्षक, अभ्यासक तसेच प्रशासकीय क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या लिखाणाचा मोठा आधार मिळाला. त्यांचे ग्रंथ केवळ वाचण्यासाठी नव्हे, तर विचार करायला भाग पाडणारे होते.

जलसंपदा क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. जलसिंचन आयोगाचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी पाण्याच्या व्यवस्थापनाकडे केवळ तांत्रिक नव्हे, तर सामाजिक दृष्टिकोनातून पाहिले. विशेषतः पाण्यातील गाळाचा प्रश्न (गाळाभ्यास) हा त्यांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू होता. गाळ साचल्यामुळे धरणांची साठवण क्षमता कमी होते, शेतीवर परिणाम होतो आणि भविष्यातील जलनियोजन धोक्यात येते – या सर्व बाबी त्यांनी शास्त्रीय आधारासह मांडल्या. त्यांच्या अभ्यासामुळे पाणी व्यवस्थापनाच्या धोरणात्मक चर्चेला दिशा मिळाली.

माझ्या वैयक्तिक आयुष्यात डॉ. उल्हासजी फडके यांचे स्थान अत्यंत मोलाचे होते. ते माझ्यासाठी केवळ अभ्यासक किंवा ज्येष्ठ मार्गदर्शक नव्हते, तर जीवनातील प्रत्येक टप्प्यावर योग्य दिशा दाखवणारे संस्कारक्षम गुरू होते. कार्यालयीन कामकाजातील पत्रव्यवहार, प्रशासकीय बाबी, शैक्षणिक निर्णय किंवा जीवनातील गुंतागुंतीचे प्रसंग – प्रत्येक वेळी ते अत्यंत संयमाने, अनुभवाच्या आधारे आणि सकारात्मक दृष्टिकोनातून मार्गदर्शन करत. त्यांच्या सल्ल्यात नेहमी स्पष्टता, दूरदृष्टी आणि आत्मविश्वास असायचा.

त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे होते. मोठ्या पदांवर काम करूनही त्यांनी कधीही साधेपणा सोडला नाही. बोलण्यात सौम्यता, विचारांत ठामपणा आणि वागण्यात माणुसकी हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक पैलू होते. प्रचंड ज्ञान असूनही अहंकाराचा लवलेशही त्यांच्यात नव्हता. तरुणांशी संवाद साधताना ते नेहमी प्रेरणादायी असत आणि ज्येष्ठांशी चर्चा करताना समतोल भूमिका घेत.

डॉ. उल्हासजी फडके यांचे जाणे ही न भरून निघणारी हानी आहे. मात्र त्यांनी दिलेले विचार, लिहिलेली पुस्तके, उभारलेली मूल्ये आणि घडवलेली माणसे यांमधून ते सदैव समाजमनात जिवंत राहतील. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांनी पुढे नेणे, हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

**भावपूर्ण श्रद्धांजली.**

**नितीन बा. बिरणवार**
**भंडारा**

## तुमसरात मोकाट कुत्र्यांचा हैदोस, न.प.प्रशासन झोपेत!



संग्रहित छाया

**हर्षल खडसे/युवाराष्ट्र दर्शन**

**तुमसर २५ डिसेंबर :** मोकाट कुत्र्यांमुळे नागरिकांना चांगलाच अडचणींचा सामना करावा लागत आहे.करिता नगर परिषद प्रशासनाने तात्काळ मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शहरातील जनता करत आहे.

संपूर्ण तुमसर शहरातील वार्डात मुख्य रस्त्यावर मोकाट कुत्र्यांनी हैदोस माजवल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शाळकरू विद्यार्थ्यामधे अधिक भीतिचे वातावरण दिसत आहे. पायदळ व दुचाकीने प्रवास करणाऱ्या नागरीकांना या मोकाट कुत्र्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शहरातील ही मोकाट कुत्रे झूंडिने वार्डात फिरत असल्याने दारा समोर खेळत असलेल्या लहान मुलांना चावा घेण्याच्या शक्यतेला नाकारता येत नाही त्यामुळे लहान मुले असलेल्या पालकांमधे भितीचे वातावरण पसरले आहे.

मात्र शहरातील नगर परिषद प्रशासन झोपेत आहे का?असा सवाल जनतेत उपस्थित केले जात आहेत.करिता तात्काळ नगर परिषदेने या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी शहरातील जनता करत आहे.

### कर्मचारी झाले छूमंतर,वार्डातील स्वछतेचे काय ?

अंदाजे दोन ते तीन वर्षा अगोदर नगर परिषदेने स्वछता करात वाढ करुन शहरातील संपूर्ण वार्डातील एक एक रस्ता दरदिवशी सकाळी स्वछ होणार असल्याचा गाजावाजा केला होता,मात्र काही दिवस वार्डात कर्मचारी सफाई करिता दिसले. नंतर कर्मचारी छूमंतर झाल्याचे नागरिकांमधे बोलले जात असते. त्यामुळे शहरातील नगर परिषद प्रशासना विरुद्ध नागरिकांमधे रोष दिसून येत आहे.करिता नगर परिषदेने दरदिवशी वार्डातील साफ सफाई करावी अशी मागणी जनता करित आहे.हे विशेष.

## ज्वेलरी दुकान फोडणारे गजाआड

**आंधळगाव :** येथील दुर्गा ज्वेलर्स दुकान फोडून तब्बल ३४ लाख ७५ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या चोरट्यांना अखेर दहा महिन्यांनंतर आंधळगाव पोलिसांनी अटक केली आहे. पुणे येथून दोन आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून सुमारे २२ लाख ९६ हजार ५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ६ फेब्रुवारी २०२५ च्या मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी दुर्गा ज्वेलर्स दुकानाचे कुलूप तोडून चोरी केली होती. दुकानमालक विनोद सोनी यांनी आंधळगाव पोलिसात तक्रार दाखल केली होती. या घटनेचा छडा लावण्याचे मोठे आवाहन आंधळगाव पोलिसांसमोर होते. तब्बल दहा महिन्यांच्या तपासानंतर ठाणेदार नितीन राठोड यांनी विशेष पथक तयार करून तांत्रिक व गोपनीय माहितीच्या आधारे पुणे जिल्ह्यातून वेद संचित राजपूत (२४, पाथरगाव, पुणे) आणि कपिल मनोरीय राजपूत (२६, बाजेवाडी, पुणे) या दोघांना पकडण्यात आले.

## आज सुशासन दिनानिमित्त भंडाऱ्यात भव्य स्वच्छता अभियान

**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा:** 'भारतरत्न, माजी पंतप्रधान स्वर्गीय श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती (२५ डिसेंबर) संपूर्ण देशात 'सुशासन दिन' म्हणून साजरी केली जाते. या पवित्र दिनाचे औचित्य साधून, भंडारा नगरपरिषद, भारतीय जनता पार्टी आणि शहरातील विविध सामाजिक संघटनांच्या संयुक्त विद्यमाने भंडारा शहरात 'भव्य स्वच्छता अभियानाचे' आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानाची सुरुवात दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक ७:३० वाजता स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून होईल. हे अभियान गांधी चौक ते पोस्ट ऑफिस चौक या मार्गावर राबविण्यात येईल.

या प्रसंगी प्रामुख्याने मा. श्री. परिणयजी फुके (माजी राज्यमंत्री व विद्यमान आमदार, महाराष्ट्र राज्य) श्री. जुम्मा प्यारे (मुख्याधिकारी, नगरपरिषद भंडारा)तसेच भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. स्वच्छ आणि सुंदर भंडारा शहराच्या उभारणीसाठी या स्वच्छता यज्ञात आपला सहभाग अत्यंत मोलाचा आहे. तरी शहरातील सर्व नागरिक, ज्येष्ठ नागरिक, तरुण मित्र आणि माता-भगिनींनी या स्वच्छता अभियानात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, ही नम्र विनंती नवनियुक्त नगर अध्यक्ष सौ मधुराताई मदनकर यानी केले आहे.

# भंडारा येथे राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा





**युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी**

**भंडारा :** राष्ट्रीय ग्राहक दिन जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद तथा जिल्हा पुरवठा कार्यालयाच्या वतीने आज दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी सामाजिक न्याय भवन च्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमात संबंधितानी बोलत होते.सुरक्षित खरेदी, स्पष्ट माहिती, निवडीचा अधिकार, तक्रार निवारण आणि न्याय मिळण्याचा हक्क हे सर्व ग्राहकांना माहिती असले पाहिजे. जेव्हा आपण सजग ग्राहक होतो, तेव्हा बाजार तितकाच पारदर्शक आणि जबाबदार बनतो.

**राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणजे काय**

हा दिवस राष्ट्रपतींनी ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ ला मान्यता दिल्याच्या वर्धापन दिनानिमित्त साजरा केला जातो, ज्याने देशात संरचित ग्राहक हक्क व्यवस्थेचा पाया घातला . गेल्या काही वर्षांत, हा दिवस सुधारणांचे मूल्यांकन करण्यासाठी, जागरूकता वाढवण्यासाठी आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करण्यासाठी एक व्यासपीठ बनला आहे.असे कार्यक्रमाचे सदस्य सचिव तथा जिल्हा अन्न पुरवठा अधिकारी नरेश वंजारी बोलत होते.

या कायद्यामुळे प्रथमच ग्राहकांना कायदेशीर संरक्षण मिळाले. ग्राहक संरक्षण म्हणजे ग्राहकाचे हक्क व हितसंबंधाचे संरक्षण होय. आजच्या उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या युगात बाजारपेठेत वस्तू आणि सेवांची प्रचंड विविधता दिसून येते. अशा परिस्थितीत ग्राहक अनेकदा चुकीच्या जाहिराती, भेसळ, निकृष्ट दर्जाच्या वस्तू, जास्त दर आकारणी, ऑनलाईन फसवणूक, तसेच विक्रीपश्चात सेवांमधील त्रुटींना बळी पडतो. त्यामुळे ग्राहक हक्कांची माहिती असणे आणि त्यांचा प्रभावी वापर करणे अत्यंत गरजेचे झाले आहे.

ग्राहक संरक्षण कायदा, १९८६ च्या जागी सुधारित ग्राहक संरक्षण कायदा,२०१९ लागू करण्यात आला. या कायद्यानुसार ई-कॉमर्स व्यवहारांवर नियंत्रण ठेवण्यात आले.तसेच केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधिकरण २०२० ची स्थापना करण्यात आली.या कायद्या नुसार दिशाभूल करणाऱ्या जाहिरातींवर कठोर कारवाई तरतूद करण्यात आली. ऑनलाईन तक्रार नोंदणी व जलद निवारण व्यवस्था यामुळे ग्राहकांना अधिक प्रभावी संरक्षण मिळाले.असे बोलत होते.

### ग्राहकांचे मूलभूत हक्क

१.सुरक्षिततेचा हक्क म्हणजे आरोग्य आणि जीवनाला धोका पोहोचवणाऱ्या वस्तू व सेवांपासून संरक्षण मिळण्याचा हक्क.
२.माहितीचा हक्क यात वस्तू किंवा सेवेचा दर्जा, किंमत, घटक, उत्पादन तारीख, वापर पद्धत याबाबत संपूर्ण आणि खरी माहिती मिळण्याचा हक्क.
३.निवडीचा हक्क यामध्ये स्पर्धात्मक किंमतीत विविध पर्यायांमधून निवड करण्याचा हक्क.
४.ऐकून घेतले जाण्याचा हक्क यात ग्राहकांच्या तक्रारी, सूचना आणि समस्या संबंधित प्राधिकरणांनी गांभीयार्ने ऐकून घेण्याचा हक्क.
५.तक्रार निवारणाचा हक्क यानुसार ग्राहकास फसवणूक किंवा अन्याय झाल्यास नुकसानभरपाई व न्याय मिळण्याचा हक्क.
६.ग्राहक शिक्षणाचा हक्क यामध्ये योग्य ग्राहक बनण्यासाठी आवश्यक असलेले ज्ञान,कौशल्य कर्तव्ये आणि कायदेशीर प्रक्रिया जाणून घेतली पाहिजे .

केंद्र व राज्य शासनामार्फत ग्राहक न्याय मंच, राष्ट्रीय ग्राहक हेल्पलाईन १९१५, ई-दाखिल पोर्टल, तसेच विविध जनजागृती मोहिमा राबवण्यात येतात. 'जागो ग्राहक जागो' हा उपक्रम ग्राहकांमध्ये मोठ्या प्रमाणावर जागरूकता निर्माण करतो. हक्कांसोबतच ग्राहकांनी स्वतःची कर्तव्येही ओळखणे गरजेचे आहे. ग्राहकांनी खरेदी करताना बिल व पावती घेणे,उत्पादनावरील माहिती काळजीपूर्वक वाचणे,भेसळ व फसवणूक आढळल्यास तक्रार करणे, पर्यावरणपूरक व जबाबदार खरेदी करणे. राष्ट्रीय ग्राहक हक्क दिनानिमित्त शाळा, महाविद्यालये, सहकारी संस्था, स्वयंसेवी संघटना यांच्यामार्फत व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, जनजागृती रॅली आयोजित केल्या जातात. यामागचा उद्देश म्हणजे जागृत, सजग आणि जबाबदार ग्राहक घडवणे. राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, प्रत्येक नागरिकाने स्वतःचे हक्क ओळखून त्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे.

जागृत ग्राहक हीच सशक्त अर्थव्यवस्थेची गुरुकिल्ली आहे, म्हणूनच ग्राहक जागरूकता ही काळाची गरज आह असे प्रमुख अतिथी तथा अध्यक्ष जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग सतीश आनंद सप्रे यांनी बोलत होते.

## अचानक पेट घेतलेली रूग्णाहिका जळून खाक

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २३ :** चामोर्शी तालुक्यातील वाघोली या गावातील रुग्णांना आणायला जात असताना अचानक रुग्णवाहिकेने पेट घेतल्याने रुग्णवाहिका पूर्णतः जळून खाक झाली. ही घटना सोमवार दि. २२ डिसेंबरला दोटकुली-वाघोली मार्गावर घडली. सुदैवाने रुग्णवाहिकेत रुग्ण नसल्याने जीवित हानी टळली.

रुग्णवाहिकेतून धूर निघत अससल्याने चालकाने रुग्णवा. हिका थांबवून पाहिले असता क्षणातच रुग्णवाहिकेने पेट घेतला. येथील पंचायत समिती सदस्य तथा कॉंग्रेसचे तालुका अध्यक्ष प्रमोद भगत, माजी जि. प. सदस्य कविता भगत यांच्या पुढाकारातून एक रुग्णवाहिका जनतेच्या सेवेकरिता उपलब्ध करून दिली होती.

गेल्या कालखंडामध्ये अनेक रुग्णांना नागपूर, सेवाग्राम असा विविध हॉस्पिटलमध्ये मोफत सेवा उपलब्ध करून देणारी ही रुग्णवाहिका घेवून चालक वाघोली येथे रुग्णांना आणण्यासाठी जात होता. मात्र दोटकुली-वाघोली दरम्यान अचानक गाडीतून धूर निघायला लागला. चालकाने बाहेर निघून बघितले असता, संपूर्ण रुग्णवा. हिकेने पेट घेतला.

# गडचिरोली महोत्सव व महामॅरेथॉन २०२५ चे आयोजन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२४ :** गडचिरोली जिल्हा हा अतिदुर्गम, माओवादग्रस्त, अतिसंवेदनशिल व आदिवासी बहुल असून येथील आदिवासी नागरीकांना विकासाच्या मुख्यप्रवाहात आणण्याकरीता गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने "पोलीस दादालोरा खिडकी व प्रोजेक्ट उडान' च्या माध्यमातून विविध शासकिय योजना मिळवून देत विकासाच्या संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी बांधवांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच आदिवासी संस्कृतीचे जतन करण्याकरीता व्यासपीठ उपलब्ध व्हावे या उद्देशाने दि.२५ डिसेंबर ते २७ डिसेंबर रोजी गडचिरोली पोलीस दलामार्फत भव्य "डचिरोली महोत्सव" चे आयोजन शासकीय कृषी महाविद्यालय गडचिरोली व दि. २८ डिसेंबर रोजी "महामॅरेथॉन २०२५ सिझन-३" चे आयोजन पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील जिल्हा परिषद कार्यालयाचे प्रांगणात करण्यात आले आहे.

गडचिरोली पोलीस दलाने आयोजित केलेल्या भव्य गडचिरोली महोत्सव ३ दिवस चालणार असून, या महोत्सवाचे विशेष आकर्षण आदिवासी समुह नृत्य स्पर्धा, वीर बाबुराव शेडमाके कब्बड्डी स्पर्धा व बिरसा मुंडा व्हहलीबहल स्पर्धा असून दुर्गम व अतिदुर्गम भागातून आलेल्या संघामध्ये हा स्पर्धा अत्यंत चुरशीच्या होणार आहेत.

तसेच गडचिरोली जिल्हातील विविध बचत गट तसेच विविध संस्था आपले उत्पादनाचे व वस्तुंचे स्टॉल लावणार आहेत. यासोबतच हस्तकलेच्या वस्तुंचे स्टॉल उपस्थित नागरीकांरीता उपलब्ध असणार आहेत. तसेच दि.२६ व २७ डिसेंबर सायंकाळी ६ ते १० वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमास महाराष्ट्राचे प्रसिध्द कलाकार सहभागी होणार आहेत. यामध्ये सुरेश वाडकर (प्रसिध्द गायक), भारत गणेशपुरे (चला हवा येऊ द्या फेम), कुशल बद्रिके (चला हवा येऊ द्या फेम), हेमांगी कवी (चला हवा येऊ द्या फेम), ममता उईके ('ओ सांगो' गोंडी सॉंग फेम), निरंजन बोबडे (झी मराठी सारेगमप विजेता), माधुरी पवार (मराठी सिने अभिनेत्री), पद्मनाभन गायकवाड (सुप्रसिद्ध मराठी गायक) व अर्जुन धोपटे ('ओ सांगो' गोंडी सॉंग फेम) हे आपली कला सादर करणार आहेत. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील स्थानिक कलाकारांनी सहभाग घेतला आहे.

तसेच महामॅरेथॉन २०२५ या स्पर्धेत जिल्ह्यातील १४ हजार हुन अधिक स्पर्धक सहभाग होणार आहे. सदर स्पर्धेत वेगवेगळ्या वयोगटासाठी वेगवेगळे अंतर असून त्यामध्ये २१ किमी, १० किमी, ५ किमी, ३ किमी. स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये सर्व सहभागी होण्या.या धावपटुंना टी-शर्ट, मेडल, डुडी बॅग, प्रमाणपत्र, झुंबा सेशन, अल्पोपहार व विजेत्यांसाठी स्पर्धकांना पुरुष व महिला या वेगवेगळ्या दोन्ही प्रवर्गामध्ये २१ कि.मी गटात प्रथम ५१ हजार, द्वितीय ३१ हजार व तृतीय २१ हजार रुपये, १० कि.मी गटात प्रथम २१ हजार, द्वितीय १५ हजार व तृतीय ११ हजार, ५ कि.म ी गटात प्रथम १५ हजार, द्वितीय ११ हजार व तृतीय ८ हजार व ३ कि. मी गटात प्रथम ११ हजार,द्वितीय ७ हजार व तृतीय ३ हजार रुपये असे एकूण ४ लक्ष १४ हजार रुपयांच्या बक्षीसाचे वितरण करण्यात येणार आहे. तरी या सर्व खेळाडू व कलाकारांचा उत्साह द्विगुणीत करण्याकरीता सर्व नागरीकांनी या महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक नीलोत्पल यांनी केले अहे

## वडसा नगर परिषद विजय म्हणजे जनतेच्या विश्वासाचा विजय - सुनिल पारधी

**विशेष प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.२५ :** वडसा नगर परिषदेत भारतीय जनता पक्षाला मिळालेला ऐतिहासिक विजय हा केवळ एका व्यक्तीचा नसून, तो भाजप कार्यकर्त्यांचे अथक परिश्रम, शिस्तबद्ध संघटन आणि जनतेने पक्षावर दाखवलेल्या प्रेमामुळे हा विजय जनतेचा विश्वा. साचा विजय आहे, अशी भावना भाजप तालुका अध्यक्ष सुनील पारधी यांनी व्यक्त केली.



विजयानंतर संवाद साधताना पारधी यांनी या विजयाचे श्रेय कार्यकर्त्यांना आणि जनतेला दिले. ते म्हणाले की, 'माजी आमदार कृष्णा गजबे यांचे जनतेशी असलेले अतूट नाते आणि त्यांनी सर्वसामान्यांसाठी केलेले काम या विजयाचा मुख्य आधार ठरले आहे.'

सुनील पारधी यांनी पुढे नमूद केले की, भारतीय जनता पक्षाने नेहमीच शेतकरी, शेतमजूर, युवक, महिला आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य दिले आहे. आम्ही केलेल्या अविरत कार्याची पावती आज जनतेने मतपेटीतून दिली आहे. हा विजय केवळ जल्लोष करण्याचा नसून, आम्हाला अधिक जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शेवटी, 'वडसा तालुक्यातील मतदारांचे असेच प्रेम आणि आशीर्वाद भविष्यातही पक्षावर राहतील,' अशी आशा सुनील पारधी यांनी व्यक्त केली. या विजयामुळे संपूर्ण तालुक्यात भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## बस थांब्याच्या मागणीसाठी विद्यार्थी रस्त्यावर, राष्ट्रीय महामार्ग रोखला

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** वारंवार मागणी करूनही एक्स्प्रेस गाड्यांचा थांबा दिला जात नसल्याने पोर्ला या गावातील विद्यार्थ्यांनी मंगळवारी मुख्य मार्गावर ठाण मांडून चक्काजाम आंदोलन केले. यामुळे गडचिरोली ते नागपूर या मुख्य मार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती. दोन्ही बाजुने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. यामुळे प्रशासकीय यंत्रणेची धावपळ झाली. अखेर त्यांनी सर्व गाड्यांना थांबा देण्याचे आश्वासन दिल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

गडचिरोली ते आरमोरी मार्गात पोर्ला या मुख्य गावाला बसचा थांबा आहे. मात्र अनेक बसेस थांबतच नाही, असा विद्यार्थ्यांचा आरोप आहे. वास्तविक पोर्ला येथील अनेक विद्यार्थी आरमोरी, गडचिरोली येथे शिक्षणासाठी येतात. पण थांबा नसल्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. या मनस्तापाला कंटाळून विद्यार्थ्यांनी अचानक रस्त्यावर ठाण मांडून चक्काजाम आंदोलन केले.

पोलीस आणि महसूल यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहोचून विद्यार्थ्यांची समजूत काढली. बस थांबा देण्याचे आश्वासनही दिले. त्यानंतर हे आंदोलन मागे घेतले. यावर कायमस्वरूपी तोडगा न निघाल्यास पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा विद्यार्थी व पालकांनी दिला आहे.

## २२ मुस्लीम जोडपी अडकणार विवाहबंधनात

**तालुका प्रतिनिधी**
**देसाईगंज दि.२५ :** देसाईगंज येथील मुस्लीम जमाअत संघटना गेल्या १३ वर्षांपासून सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करीत आहे. ही परंपरा पुढे नेत यावर्षी ७ जानेवारी २०२६ रोजी २२ मुस्लिम जोडप्यांचा सामूहिक निकाह आयोजित करण्यात येणार आहे. हा सोहळा मदीना मशीद मैदान येथे पार पडणार आहे.

सोहळ्याचे मुख्य संघटक तसेच गडचिरोली जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष हाजी बशीर पटेल यांनी सांगितले की, या उपक्रमात विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व नागपूर या ५ जिल्ह्यांतील २६ तालुक्यातून २२ जोडप्यांचा विवाह लावून दिला जाणार आहे. या जोडप्यांपैकी वर किंवा वधू संबंधित तहसीलचा रहिवासी असणार आहे. आयोजकांनी कार्यक्रमासाठी आवश्यक सर्व तयारी पूर्ण केल्याची माहिती दिली आहे. या सामाजिक उपक्रमाला यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हाजी बशीर पटेल यांनी केले आहे.

## शिवाजी हायस्कूल चामोर्शीत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**तालुका प्रतिनिधी**
**चामोर्शी दि.२५ :** येथील शिवाजी हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय बाल आरोग्य स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. अविनाश गौरकार, उपप्राचार्य संघमित्रा कांबळे, डॉ. भैसारे, पुरूषोत्तम ध्यार व त्यांची संपूर्ण चमू उपस्थित होते. विद्यार्थ्यांना आरोग्य वैयक्तिक स्वच्छता रक्तक्षय याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांना सिकलसेल आजाराबाबत माहिती देण्यात आली. जवळपास १५०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आले. डॉ. गौरकर यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक सुदृढ राहण्यासाठी मार्गदर्शन केले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करून त्यांना आरोग्यबाबत विविध विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

## ग्राहक संरक्षणासाठी डिजिटल प्रणालीचा वापर आवश्यक

### जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** बदलत्या डिजिटल युगात ग्राहक संरक्षणासाठी डिजिटलीकरण आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी अविश्यांत पंडा यांनी केले. ऑनलाइन व्यवहार, डिजिटल पेमेंट प्रणाली, ई-तक्रार नोंदणी तसेच तंत्रज्ञानाधारित सेवा यामुळे व्यवहारात पारदर्शकता येऊन ग्राहक. ांना जलद व सुलभ सेवा मिळते, असे त्यांनी नमूद केले. ग्राहकांनी खरेदी करताना बिल घेणे, सेवा व वस्तूंच्या दर्जाबाबत जागरूक राहणे आणि तक्रारी असल्यास अधिकृत मंचावर नोंद करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी कार्यक्रमात मार्गदर्शन करताना सांगितले




अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या वतीने राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त आज गोंडवाना कला केंद्र, गडचिरोली येथे जिल्हास्तरीय जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्राहक हक्क, तक्रार निवारण व्यवस्था तसेच डिजिटल साधनांचा प्रभावी वापर याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाला चंद्रशेखर भडांगे (अशासकीय सदस्य, जिल्हा ग्राहक संरक्षण समिती), तहसीलदार सागर कांबळे, शिरीष कापडे (सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी), ॲड. माधुरी आटमांडे (सदस्य, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, गडचिरोली), प्रवीण घाटे (अशासकीय सदस्य), प्रा.अरुण मुनघाटे, उदय धकाते, विजय मुसन. वार (सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गडचिरोली), आंबेकर (तालुका पुरवठा अधिकारी, गडचिरोली), देवानंद फुलझेले (वजन-मापे अधिकारी), दीपक चौधरी (स्वस्त धान्य दुकानदार संघटना), विजय शृंगारपवार, चंद्रक. ांत पतरंगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, प्रतिनिधी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून ग्राहक हक्कांविषयी जनजागृती होऊन ग्राहक संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम होण्यास मदत होईल, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

## डॉ.होळी यांची वनमंत्री गणेश नाईक यांच्याशी भेट

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** माजी आमदार डॉ.देवराव होळी यांनी मुंबई येथे राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नां सोबतच मागील २ वर्षांपासून हत्तीने धुमाकूळ घातला असून वाघाने सुद्धा शेकडोच्या जवळपास नागरिकांचा बळी घेतला या बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.



यावेळी डॉ.होळी यांनी वनावर आधारित उद्योगांना चालना देणे, वन जमिनीचे पट्टे (अतिक्रमण धारकांना) देण्यात यावे, आदिवासी. चें वनावरील हक्क अबाधित ठेवावे तसेच गडचिरोली जिल्ह्यातील वन विभागाशी निगडित प्रलंबित समस्यांचे निराकरण करण्याबाबत सविस्तर निवेदन वनमंत्र्यांना सादर केले. स्थानिक नागरिकांच्या उपजी. विकेशी संबंधित प्रश्न, विकासक. ामांतील अडथळे आणि वनहक्काशी निगडित अडचणी याकडेही त्यांनी लक्ष वेधले. यावेळी जिल्ह्यात हत्ती व वाघाने धुमाकूळ घातला असून जिल्ह्यात हट्टीमुळे अनेक शेतकऱ्यांचे हाती आलेले पीक हत्तीने नेस्तनाबूत केले आहे. सोबतच काही गावात शिरून घरांचे सुद्धा नुकसान केल्याचे निदर्शनास आणून दिले. तसेच वाघानेही जिल्ह्यात धुमाकूळ घातला असून सरपण आणण्यासाठी जंगलात गेलेल्या नागरिकांनी आपला जीव गमवलेले असल्यामुळे वाघ व हत्तीच्या आतंकामुळे जिल्ह्यातील नागरिक भयभीत झाले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील हत्ती व वाघांपासून माणसाचे व शेतीचे नुकसान झाले त्याचे त्वरित पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी आणि वाघाचा व हत्तीचा ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी सुद्धा डॉ.देवराव होळी यांनी केली. सोबतच गडचिरोली जिल्ह्याला प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, असा प्रस्तावही डॉ.होळी यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्यासमोर मांडला.

या निवेदनाची दखल घेत वनमंत्री गणेश नाईक यांनी गडचिरोली जिल्ह्यातील समस्यांचे सर्वोत्तम पद्धतीने निवारण करण्याचे आश्वासन दिले. लवकरच गडचिरोली जिल्ह्याला भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांसह बैठक घेणार असल्याचेही त्यांनी यावेळी सां. गितले.

## विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २३ :** अनुस. ूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतीगृहात अर्ज करुन देखील शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना मॅट्रीकोत्तर शिक्षण घेता यावे आणि विद्यार्थ्यांना भोजन, निवास, निर्वाह भत्ता व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेणेसाठी आवश्यक ती रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये थेट जमा करणेकरीता शासनाने १३ जुन २०१८ च्या सुधारीत शासन निर्णयान्वये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात योजनेचा लाभ घेणेकरीता विद्यार्थ्यांना वस्तीगृहात व स्वाधार योजनेचे लाभ घेणेकरीता विद्यार्थ्यांना वस्तीगृहात व स्वाध्याय योजनेचे अर्ज करणेकरीता एकच ऑनलाईन पोर्टल सुरु करण्यात आले आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वस्तीगृहात अर्ज करुन देखील शासकीय वसतीगृहात प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांचे अर्ज ऑनलाईन प्रणालीव्दारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने. करीता ग्राहय धरले जावून नियमानुसार पुढील पडताळणीसाठी संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाच्या लॉगीन वर अग्रेशित केले जातील. सदर माहिती पोर्टलवरील लॉगीनमध्ये विद्यार्थ्यांनी परिपूर्ण भरणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सदर माहिती अपुर्ण भरल्यास सदर अर्ज अपात्र करण्यात येईल व त्यासाठी सर्वस्वी विद्यार्थी जबाबदार राहील याबाबत नोंद घेण्यात यावी.

अर्ज करण्याकरीता ऑनलाईन पोर्टल- https://hmas.mahait.org हे असुन स्वाधार योजनेकरीता ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत असून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली यांचेकडे ऑनलाईन अर्ज करण्यात यावे. असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, गडचिरोली डॉ. सचिन मडावी यांनी केले आहे.

## श्रमदानातुन पांदन रस्त्याची निर्मिती

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** आज दि २४ डिसेंबरला मुख्यमंत्री समृद्ध ग्राम पंचायत राज अभियान अंतर्गत श्रमदानातून ग्रामपंचायत सावंगीच्या वतीने पांदन रस्ता तयार करण्यात आला.



यावेळी सावंगी ग्रामपंचायतच्या सरपंचा प्रभा ढोरे, उपसरपंच सुमत मेश्राम, रोजगार सेवक देवानंद बन्सोड व ग्राम पंचायत सदस्य, बचत गटाच्या महिला, आणि गावातील नागरीकांच्या साहाय्याने पांदन रस्ता - तयार करण्यात आला.

## बानय्या जनगाम यांचा गरकापेठा ग्रापंतर्फे सत्कार

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** अहेरी विधानसभा क्षेत्राचे आमदार तथा माजी कॅबिनेट मंत्री डॉ. धर्मराव बाबा आत्राम यांनी आदिवासी विद्यार्थी संघटना सिरोंचा तालुका अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कॉंग्रेस नेते बानय्या जनगाम यांना गडचिरोली जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी निवड करण्यात आली. ग्रामपंचायत गरकापेठा सरपंच, उपसरपंच व गावाकऱ्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार ) गटचे पदा. धिकारी व कार्यकर्त्यांनी सिरा. ेंचा येथे बानय्या जनगाम यांना शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरपंच सूरज गावडे, उपसरपंच वेंकटी दसरी, सरपंच लक्ष्मण गावडे, समय्या इरलासह राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार ) गटचे पदा. धिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त जिल्हा कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाल्याने बानय्या जनगाम यांचा गरकापेठा ग्रामपंचायतीर्फे सत्कार करून त्यांना पुढील राजकीय वाटचालीस राष्ट्रवादी पदा. धिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

## श्री संत जगनाडे महाराज पुण्यतिथीतून समाजजागृतीचा संदेश!



### वैरागड येथे तेली समाज मेळावा
### उत्साहात मेळाव्यातूनच समाजाची जागृती - प्रमोद पिपरे

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** वैरागड येथे ११ डिसेंबर रोजी तेली समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भव्य तेली समाज मेळावा व श्री संत जगनाडे महाराज पुण्यतिथी कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. समाजप्रबोधन, एकात्मता व संघटनाचा संदेश देणारा हा कार्यक्रम सामाजिक बांधिलकी जपणारा ठरला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाग्यवान खोब्रागडे हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासंघाचे जिल्हाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या. पुणेचे संचालक प्रमोद पिपरे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून महिला आघाडी विभागीय उपाध्यक्ष योगिता पिपरे, प्राचार्य पी. आर. आकरे, परसराम टिकले (माजी सभापती पं.स.वडसा), नवनियुक्त नगराध्यक्ष प्रणोती निंबाळकर, विलास पारधी, नवनियुक्त नगरसेवक शुभम निंबेक. ार, सागर निंबाळकर, सरपंच संगीता पेंदाम, बुधाजी किरमे (माजी सरपंच आरमोरी), भास्कर बोडने (उपसरपंच वैरागड) आदी उपस्थित होते.

यावेळी नवनियुक्त नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच समाजातील सेवा. निवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा शाल व श्रीफळ देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करून समाजातील शैक्षणिक प्रगतीचा गौरव करण्यात आला.

मेळाव्यात मार्गदर्शन करताना प्रमोद पिपरे म्हणाले की, "श्री संत जगनाडे महाराजांनी समतेचा, परिश्रमाचा आणि समाजोन्नतीचा जो विचार दिला, तो आजच्या पिढीने आचरणात आणण्याची गरज आहे. केवळ राजकारण नव्हे तर शिक्षण, संघटन, आर्थिक स्वावलंबन आणि सामाजिक एकोपा यावर तेली समा. जाने लक्ष केंद्रित केले पाहिजे. समाज जागा झाला तरच तो प्रगती करतो, आणि हे मेळावे हीच त्या जागृतीची खरी ताकद आहे." त्यांनी युवकांनी शिक्षण, स्पर्धा परीक्षा व सामाजिक नेतृत्वाकडे वळावे, असे आवाहन करत समाज एकसंध ठेवण्यावर भर दिला.

कार्यक्रमास आदेश आकरे, संगीता मेश्राम, भास्कर हुमणे, डॉ. निशिगंधा नैताम, लीला मुंडले (माजी सरपंच चोप), पूनम गुरनुले (माजी जि. प. सदस्य), पांडुरंग बावनकर, पुंडलिक देशमुख, दिलीप चिलबुले, विजय गुरनुले, डोनुजी कांबळे, सत्यदास आत्राम, प्रतिभा बनकर, दिपाली डोंगरे, बी. ए. हुमणे, महादेव दुमाने, बालाजी पोफळी, शुभाष बरडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रदीप बोडणे यांनी केले. यशस्वीतेसाठी रमेश लांजेवार, संदीप ठेंगरे, सुखदेव बोडणे, सुरेश बावनकर, रेखा बोधनकर, गायत्री आकरे तसेच समस्त तेली समाज बांधव वैरागड यांनी मोलाचे सहकार्य केले. मेळाव्याची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

## हमीभाव केंद्रावरच कापूस विका - अतुल गण्यारपवार

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि.२५ :** भारतीय कपास निगम अंतर्गत शासनाच्या आधारभूत किमतीनुसार कापूस विक्री करण्यासाठी कपास किसान ॲपवर नोंदणीची मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आहे. गडचिरोली जिल्ह्यात अंदाजे ६ हजार कापूस उत्पादक शेतकरी आहेत. ज्यांनी अद्याप नोंदणी केली नाही त्यांनी लवकर किसान ॲपवरून नोंदणी करावी, असे आवाहन महा.राज्य मार्केटिंग फेडरेशन लि.मुंबईचे संचालक तथा जि.प.चे माजी कृषी सभापती अतुल गण्यारपवार यांनी केले.

जिल्ह्यात लाखो क्विंटल कापुस उत्पादित झालेला आहे. मात्र आतापर्यंत केवळ १७०२ शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे, तर १२१८ शेतकऱ्यांनी संपुर्ण कागदपत्रांसह कपास किसान ॲप डाऊनलोड केले आहे. त्यांचे अलॉटमेंट झाले आहे. ५१६ शेतकऱ्यांनी संपूर्ण कागदपत्रे कपास किसान ॲपवर अपलोड न केल्यामुळे त्यांचे अलॉटमेंट झालेले नाही.

आतापर्यंत ५७२ शेतकऱ्यांनी शासनाच्या आधारभूत कापूस केंद्रावर कापूस विक्री केला आहे. अद्याप अंदाजे ४ हजार शेतकऱ्यांनी शासनाच्या आधारभूत कापूस विक्री केंद्रावर कापुस विक्रीची नोंद केलेली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे वैयक्तिक लाखो



रुपयांचे नुकसान होणार आहे. गडचिरोली जिल्ह्यात बाहेरील कापूस खरेदीदार व्यापारी अंदाजे ६५०० ते ७००० च्या भावाने कापूस खरेदी करतात, तर शासनाच्या आधारभूत खरेदी केंद्रावर कापुस विक्रीचे दर मध्यम धागा ७७१० रुपये आणि लांब धागा ८११० रुपये प्रतिक्विंटल असा भाव आहे. शेतकऱ्यांना शासनाच्या कापुस खरेदी केंदावर वाहतुक करण्याकरीता अंदाजे एका ट्रकसाठी ८ ते १० हजार रुपये खर्च येत असला तरी एका ट्रकगाडीत अंदाजे ७० ते ८० क्विंटल कापूस येतो. म्हणजेच अंदाजे ८० हजार रुपयांचा नफा मिळतो. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी पूर्ण केली नाही त्यांनी कापूस विक्रीकरीता संपुर्ण कागदपत्रांसह शासनाच्या कापुस किसान ॲपवर सर्व कागदपत्रे अपलोड करून कापूस विक्रीची नोंदणी करावी, असे आवाहन गण्यारपवार यांनी केले आहे.

